**महाराष्ट्र शासन**

क्र.स्वभामि -२०१६/प्र.क्र.१०८ /पापु-०८
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
७ वा मजला, जी.टी. रुग्णालय संकुल,
मंत्रालय, मुंबई ४००००१
दूरध्वनी (०२२) २२६१७२८५
E-mail: hemant.dange@nic.in
दिनांक: १७ मे, २०१६

**प्रति,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व).**

विषय:- स्वच्छ भारत मिशन- ग्रामीण अंतर्गत अतिक्रमण बाधित जमिनीवर शौचालय बांधण्याबाबत.

महोदय,

अवर सचिव, स्वच्छ भारत मिशन - ग्रामीण, केंद्रिय पाणी व स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. २८ एप्रिल,२०१६ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे.

२. स्वच्छ भारत मिशन - ग्रामीण अंतर्गत गवताळ प्रदेश, सरकारी जमीन, वन जमीन इत्यादी जमिनीच्या प्रकारावरील वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन होती. केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन - ग्रामीण या कार्यक्रमासाठी निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शौचालय बांधकामासाठी पात्र लाभार्थी निश्चित करण्यास राज्य शासन सक्षम असून लाभार्थ्यांची पात्रता ही त्याच्या वास्तव्याच्या जागेच्या प्रकारावरुन निश्चित करण्यात आलेली नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती तसेच सर्वांना सूरक्षित स्वच्छता पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण या कार्यक्रमांतर्गत अतिक्रमित जमीनीवर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालय अनुज्ञेय असल्याचा खुलासा करुन त्यानुसार राज्य शासन समुचित निर्णय घेऊ शकेल असे वरील पत्रान्वये स्पष्ट केले आहे.

३. केंद्र शासनाच्या उपरोक्त खुलाशास अनुसरुन मला असे कळविण्याचे आदेश आहेत की, राज्यातील अतिक्रमित जमिनीवर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना स्वच्छ भारत मिशन- ग्रामीण अंतर्गत वैयक्तिक शौचालय अनुज्ञेय असून अशी कुटुंबे प्रोत्साहनपर अनुदान मिळण्यास देखील पात्र असतील. तथापि, **अशा शौचालयांच्या बांधकामांना कोणत्याही कालावधीचे संरक्षण मिळणार नाही व अशा शौचालय बांधकाम केलेल्या जागेवरील हक्क देखील संबंधितांना देय ठरणार नाही**, ही बाब संबंधितांना स्पष्ठ करण्यात यावी.

४. वरील सुधारीत सूचना विचारात घेवून आपल्या स्तरावर समुचित कार्यवाही कृपया करण्यात यावी.

**सोबत- वरीलप्रमाणे**

**आपला,**

**(वसंत भि. माने)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

1. **उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त (सर्व)**
2. **उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता), जि. प. सर्व.**
3. **संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.**

Scanned by CamScanner